## 5. राष्ट्रीय सेवा योजनेच्या युनिट्सकडून राबविण्यात आलेले कृती कार्यक्रम : –

### अ) स्वच्छता पंधरवडा :

१ ते १५ ऑगस्ट २०१९ या कालावधी स्वच्छता पंधरवडा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचा अहवाल महाराष्ट्र शासनास सादर केलेला आहे.

### ब) नियमित कार्यक्रम :

नियमित कार्यक्रमांतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन

- जागतिक पर्यावरण दिन.
- जागतिक योग दिन.
- स्वच्छ भारत अभियान.
- 'बेटी बचाओ–बेटी बचाओ' अंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन.
- डिजीधनच्या माध्यमातून संगणक साक्षरता, भीम ॲपचा प्रचार व प्रसार यासाठी कार्यक्रमांचे आयोजन.

### क) विशेष शिबिर :

राष्ट्रीय सेवा योजनेच्या ४५ युनिट्सकडून विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले.

- विशेष शिबिरात वृक्षारोपण, ग्रामस्वच्छता, प्राथमिक शाळेची स्वच्छता, आरोग्य तपासणी, गोठा स्वच्छता या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.
- सांडपाण्याच्या व्यवस्थापनासाठी शोषखड्डे तयार करण्यात आले.
- अवयवदान, नेत्रदान व रक्तदान यावर विशेष भर देण्यात आला.
- रस्ता सुरक्षा अभियान व शासकीय योजनांची माहिती दिली.
- वनराई बंधारे तयार करण्यात आली.

## 6. कार्यशाळा / बैठकांचे आयोजन : –

### ❑ कार्यक्रम अधिकारी कार्य–आढावा बैठक

* दिनांक २५ जुलै २०१८ रोजी विद्यापीठ मुख्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती.
* दिनांक २५ ऑगस्ट २०१८ रोजी कोल्हापूर विभागीय केंद्रांतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकाऱ्यांची एकदिवसीय बैठक विभागीय केंद्र, कोल्हापूर येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय संचालक **श्री. के.व्ही. काद्री नरसिंह** यांच्यासमवेत घेण्यात आली होती.

### ❑ राज्य सल्लागार समिती बैठक

दिनांक १० सप्टेंबर २०१८ रोजी मुख्यालयात बैठक आयोजित करण्यात आली.

### ❑ नव्याने मान्यता दिलेल्या केंद्रांची / युनिट्सची बैठक

दिनांक २२ ऑक्टोबर २०१८ रोजी विभागीय केंद्र पुणे अंतर्गत नव्याने मान्यता दिलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकाऱ्यांची एकदिवसीय बैठक विभागीय केंद्र पुणे येथे आयोजित करण्यात आली.

### ❑ महाराष्ट्र शासनाकडून आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षण कार्यक्रम / कार्यशाळा

१) दिनांक ६ व ७ सप्टेंबर २०१८ रोजी खुल्ताबाद, जि. औरंगाबाद येथे आयोजित करण्यात आलेल्या 'युवा माहितीदुत' प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग.

२) दिनांक २३ ऑक्टोबर २०१८ रोजी बालेवाडी, पुणे येथे 'खेलो इंडिया' कार्यक्रमात सहभाग.

३) दिनांक २३ व २४ फेब्रुवारी २०१९ रोजी बालेवाडी, पुणे येथे 'सक्षम युवा समर्थ भारत' अभियानांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या राज्यस्तरीय कार्यशाळेत सहभाग.

## 3. स्वच्छ भारत अभियान (ग्राम दत्तक योजना)

स्वच्छ भारत अभियानांतर्गत सन २०१५-१६ मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यापीठाने ८ विभागीय केंद्रामध्ये प्रत्येकी एक अशी आठ गावे दत्तक घेतली आहेत. विद्यापीठाकडून या गावांच्या विकासासाठी प्रत्येकी रु. २ लाखांचा निधी मंजूर करण्यात आलेला असून या गावांचे मूलभूत सर्वेक्षण करून तेथे विविध उपक्रम राबविण्यात आलेले आहेत. गेल्या तीन वर्षांत राष्ट्रीय सेवा योजनेच्या जवळच्या युनिट्सकडून तेथे विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आलेले आहे. विद्यापीठाच्या कृषिविज्ञान केंद्राच्या माध्यमातून कृषिपूरक उपक्रम तेथे राबविले जात आहेत.

२०१८-१९ मध्ये दत्तक घेतलेल्या गावांपैकी फक्त दोनच गावांत (नवरगाव व मासा–शिसा) येथे विशेष शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत. उर्वरित ठिकाणी शिबिरे घेण्यात आलेली नाहीत.

| अ.क्र | दत्तक गावाचे नाव | तालुका | जिल्हा | विभाग |
|---|---|---|---|---|
| ०१ | मासा-शिसा | अकोला | अकोला | अमरावती |
| ०२ | रानमळा-भाटेपुरी | गेवराई | बीड | औरंगाबाद |
| ०३ | नवरगाव | कुरखेडा | गडचिरोली | नागपूर |
| ०४ | चहांदे | पालघर | पालघर | मुंबई |
| ०५ | बेजे-चाकोरे | त्र्यंबकेश्वर | नाशिक | नाशिक |
| ०६ | गलांडवाडी | इंदापूर | पुणे | पुणे |
| ०७ | बेळंकी | मिरज | सांगली | कोल्हापूर |
| ०८ | बेलमंडळ | कळमनुरी | हिंगोली | नांदेड |

## 4. महाराष्ट्र शासनाकडून मिळालेले अनुदान

- सन २०१५-१६ साठी ४,७६,२७६/- अनुदान मिळाले.
- सन २०६-१७ साठी ४,१६,०७३/- एवढे अनुदान प्रथम टप्प्यात मिळाले, तर अंतिम हप्ता रु. १,४१,३७५ एवढा मिळाला. असे एकूण ५,५७,४५८/- रु. एवढे अनुदान विद्यापीठास मिळाले.
- २०१७-१८ साठीचा प्रथम हप्ता (केंद्र हिस्सा) ८१% प्रमाणे ५,७१,१२५/- एवढी रक्कम विद्यापीठास PFMS प्रणालीद्वारे मिळालेली आहे.
- PFMS प्रणालीशी जोडलेल्या ३० युनिट्सला PFMS प्रणालीद्वारे दिनांक २३ मार्च २०१८ रोजी रु. ६७५०००/- एवढे अनुदान वितरित करण्यात आले.
- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी अनुदानाचा पहिला हप्ता रु. ५२१०५२/- व शैक्षणिक वर्ष २०१७-१८ चा अंतिम हप्ता रु. १६२०७३/- एवढे अनुदान PFMS प्रणालीद्वारे विद्यापीठास प्राप्त झाले.
- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या अनुदानित २४ युनिट्सला दिनांक ०७ मार्च २०१९ रोजी रु. ६७५०००/- एवढे अनुदान PFMS प्रणालीद्वारे वितरित करण्यात आले.


## ❖ कार्यक्रम अधिकारी कार्य-आढावा बैठकीचे फोटो

❖ कार्यक्रम अधिकारी कार्य-आढावा बैठक



❖ राज्य सल्लागार समिती बैठक









पुणे विभागीय केंद्रांतर्गत नव्याने मान्यता दिलेल्या केंद्रांची/युनिट्सची बैठक



'युवा माहितीदूत' प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग





'सक्षम युवा समर्थ भारत' अभियानांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या राज्यस्तरीय कार्यशाळेत सहभाग





'खेलो इंडिया' कार्यक्रमात सहभाग





## 7. राष्ट्रीय सेवा योजनेच्या युनिट्सने राबविलेले विविध नियमित कार्यक्रम :

### 7.1 वृक्षारोपण : -

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने जून महिन्यात वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यामध्ये ५० युनिट्सवरील स्वयंसेवक सहभागी झाले होते. ३००० वृक्षारोपण करण्यात आले होते. वृक्षारोपण केलेल्या झाडांचे संगोपन करण्याची जबाबदारी त्या-त्या युनिट्सने घेतलेली आहे. सोनोपंत दांडेकर महाविद्यालय, पालघर व शिक्षणमहर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब यांनी वृक्षारोपण करून झाडास Tree Guard बसविले आहे. त्यामुळे त्यांचे संवर्धन चांगल्या प्रकारे झाले आहे.





(सोनोपंत दांडेकर महाविद्यालय,पालघर आणि शिक्षणमहर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब, जि.उस्मानाबाद (वृक्षारोपण कार्यक्रम)

### 7.2 जलविषयक केलेली कामे : -

राष्ट्रीय सेवा योजनेच्या युनिट्सकडून विशेष हिवाळी शिबिरांतर्गत दत्तक घेतलेल्या गावांत स्वयंसेवकांनी श्रमदानातून CCT बंधारे बांधले. जून, जुलैमध्ये झालेल्या पावसाचे पाणी त्यामध्ये साठण्यास मदत झालेली आहे. परिणामी परिसरातील पाणी पातळीत वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे.






श्री. शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला, जि. अकोला (CCT बंधारे)

**पाणी फाउंडेशनमध्ये सहभाग :**

बीड जिल्ह्यातील आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या युनिटने हिवाळी शिबिर घेतलेल्या आनंदवाडी या गावास पाणी फाउंडेशनाचा तृतीय पुरस्कार मिळालेला आहे. ४५ युनिट्सने हिवाळी शिबिरांच्या माध्यमातून पाणी संवर्धनाच्या संदर्भात कामे केलेली आहेत.






**आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा, ता. आष्टी, जि. बीड (पाणी फाउंडेशनमध्ये सहभाग)**

## 7.3 रक्तदान शिबिर :-

राष्ट्रीय सेवा योजनेच्या युनिट्सकडून रक्तदान शिबिरे आयोजित करण्यात आली होती. त्यापैकी नानासाहेब यशवंतराव नारायणराव चव्हाण महाविद्यालय, चाळीसगाव आणि श्री. शिवाजी महाविद्यालय, अकोला यथील राष्ट्रीय सेवा योजना युनिट्सने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यात ३५ रक्ताच्या बाटल्या संकलित करण्यात आल्या.





**एन. वाय. एन. कॉलेज चाळीसगाव आणि श्री. शिवाजी महाविद्यालय, अकोला (रक्तदान शिबिर )**

### 7.4 स्वच्छता अभियान :-

स्वच्छता अभियानांतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या युनिट्सकडून सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करण्यात आली. लोकांमध्ये स्वच्छतेविषयक जागृती निर्माण करण्याचे काम या अभियानादरम्यान केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या युनिट्सने स्थानिक रेल्वे स्टेशन, बसस्थानक, सार्वजनिक आरोग्य केंद्र, नदीघाट परिसर, शाळा, महाविद्यालये व दत्तक गावांमध्ये स्वच्छतेची मोहीम राबवून समाजप्रबोधनपर व्याख्यानांचे आयोजन केले. विद्यापीठाने दत्तक घेतलेल्या गावामध्ये स्वच्छ भारत अभियानांतर्गत कार्यक्रम राबविले आहेत.





**अगस्ती कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले (स्वच्छतेविषयी जनजागृती)**

विनायक विद्यामंदिर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या युनिटने दत्तक घेतलेल्या गावात स्वच्छता अभियानांतर्गत शौचालायासाठी शोषखड्डे तयार करून दिले. तसेच घरोघरी शौचालये बांधण्याबाबत लोकांमध्ये जनजागृती व्हावी यासाठी पथनाट्याचे आयोजन करण्यात आले.





विनायक विद्यामंदिर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अमरावती (शौचालय शोषखड्डे तयार करून देताना रासेयोचे स्वयंसेवक)

### 7.5. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेले कार्यक्रम :

| Date | Activities | Theme | Origination / Activity | Participation |
|---|---|---|---|---|
| 24/09/2018 | Awareness | Swachhata Hi Seva | 1. राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन | 1. राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व युनिट्सने रासेयो स्थापना दिन साजरा केला. |
| | | | 2. 'स्वच्छता ही सेवा' कार्यक्रमाचे आयोजन.<br>3. महाविद्यालय परिसर स्वच्छता कार्यक्रम | 2. डी.एच.अग्रवाल महाविद्यालय, नवापूर<br>3. र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई, जि. बीड |
| 25/09/2018 | Publicity | Behavior Change respect of Sanitation | 4. 'पर्यावरण आणि गांधी विचार' या विषयावर व्याख्यान<br>5. स्वच्छतेविषयी जन-जागृती कार्यक्रम | 4. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक<br>5. विद्याभारती महाविद्यालय, कुरखेडा, जि. गडचिरोली |
| 26/09/2018 | Painting | Swachhata | 6. 'स्वच्छता ही सेवा' या विषयावर चित्रकला स्पर्धेचे अयोजन | 6. पेठे हायस्कूल, नाशिक<br>6.1 आनंद निकेतन, नाशिक |
| 27/09/2018 | Plastic Free Society | Environment Conservation | 7. स्वच्छता जन-जागृती अभियान | 7. मनोहरभाई पटेल महाविद्यालय, साकोली |
| 28/09/2018 | Competi-tion | Gandhiji's Life and His Work | 8. 'गांधीजी यांचे जीवन व कार्य' ह्या विषयावर व्याख्यान.<br>9. 'गांधीजी यांचे जीवन व कार्य' यावर चित्र प्रदर्शन.<br>10. ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन<br>11. निबंध /वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन | 8. मनोहरभाई पटेल महाविद्यालय, साकोली<br>9. पेठे हायस्कूल, नाशिक<br>9.1 के. जे. मेहता हाय., नाशिक<br>9.2 आनंद निकेतन, नाशिक<br>10. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक<br>10.1 डी. एच. अग्रवाल महाविद्यालय, नवापूर<br>11. पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव, जि. सांगली |
| 29/09/2018 | Lectures | Non-Violence | 12. पालघर येथे 'अहिंसा' या विषयावर व्याख्यान | 12. डॉ. प्रकाश देशमुख, संचालक, रासेयो, य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक |
| 30/09/2018 | Campaign | Sanitation | 13. सेवाग्राम येथे 'स्वच्छता ही सेवा' अभियानांतर्गत पदयात्रा व स्वच्छता कार्यक्रमाचे आयोजन | 13. एस. एस. एन. जे. महाविद्यालय, देवळी, जि. वर्धा |

| Date | Activities | Theme | Origination / Activity | Participation |
|---|---|---|---|---|
| 01/10/2018 | Awareness Campaign | De-addiction | 14. व्यसनमुक्तीसंदर्भात गीत-गायनाचा कार्यक्रम | 14. र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई, जि. बीड |
| 02/10/2018 | Gandhi Jayanti | Peace | 15. स्वच्छता ही सेवा अभियानांतर्गत विद्यापीठ परिसर स्वच्छता कार्यक्रम | 15. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक |
| | | | 16. गड-किल्ले संवर्धन व स्वच्छता | 16. आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा |
| | | | 17. परिसर स्वच्छता व वृक्षारोपण | 17. कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, उरुण इस्लामपूर, जि. सांगली |
| | | | 18. श्रमदान कार्यक्रम | 18. एन.वाय.एन. चव्हाण महाविद्यालय, चाळीसगाव<br>18.1 कॉम्रेड गोदावरी शामराव परुळेकर महाविद्यालय, तलासरी, जि. पालघर<br>18.2 किसनवीर महाविद्यालय, वाई, जि. सातारा |
| | | | 19. जल-स्रोतांची स्वच्छता | 19. सह्याद्री कनिष्ठ महाविद्यालय, धामोड, जि. कोल्हापूर |

